Rayat Shikshan Sanstha's

## Maharaja Jivajirao Shinde Mahavidyalaya, Shrigonda.

### Department of Economics

### 2017-18

# CERTIFICATE

This is to certified that Miss/Mr ..Mhaske...S..U............Student of M.A. II year has completed this Project on "The Role of unorganised sector in Budget (2017-18)" ......He / She has submitted a satisfactory report as per the requirement of S.P.P.U. Pune in partial fulfillment of M.A. II Course in the academic year 2017 -18.

**Internal Examiner**

**Head,**

**Dept. of Economics**

**Student Name:**-Mhaske Somnath Uttam

**Collage Name**:- Maharaja Jivajirao Shinde Mahavidyalay **Shrigonda Tal-Shrigonda**

**Dist** - Ahmednagar

**Std- MA- 2**

**Sem - 4**

**Roll NO:-2458**


**Project Name:- The role of development in the unorganized sector in the Finance Plan of 2017-18**


# प्रकल्पाचे नाव:-

## २०१७-१८ च्या अर्थ संकल्पातील असंघटीत क्षेत्रातील विकासाची भूमिका

# Project Name:-

## The role of development in the unorganized sector in the Finance Plan of 2017-18


Union Budget
2017-18
INFRASTRUCTURE
EDUCATION
PERSONAL TAX
GROWTH
HEALTH
PUBLIC FUNDS


A Prelude to the
UNION
BUDGET
of India 2017-18
Image Credit : The

# INDEX

| अन. | प्रकल्प मुद्दे | दिनांक | मार्क्स | शेरा | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रस्तावना | 22/2/18 | | | |
| २ | अर्थसंकल्प २०१८-ठळक तरतुदी | | | | |
| ३ | २०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पातील घोषणा | | | | |
| ४ | अर्थसंकल्प विभागणी-लोकसत्ता | | | | |
| ५ | २०१७-१८ च्या अर्थ संकल्पातील असंघटीत क्षेत्रातील विकासाची भूमिका | | | | |
| ६ | शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार | | | | |
| ७ | National बांबू मिशन | | | | |
| ८ | मत्स्य आणि पशु पालनासाठी आर्थिक तरतूद | | | | |
| ९ | बाजार समित्या इंटरनेटने जोडल्या | | | | |
| १० | जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना | | | | |
| ११ | मुंबई रेल्वेचा विस्तार | | | | |
| १२ | प्रकल्पाचे मूल्यमापन-दैनिक लोकसत्ता मधून | | | | |
| १३ | लोकसत्ता बातम्या | | | | |
| १४ | समारोप | | | | |

# प्रस्तावना

या अर्थसंकल्पात देशातील कृषी क्षेत्रापासून पायाभूत विकास क्षेत्रापर्यंत संपूर्ण लक्ष देण्यात आले आहे. अर्थसंकल्पात ज्याप्रमाणे गरीब आणि मध्यम वर्गाच्या चिंता दूर करणाऱ्या आरोग्य योजना आहेत, त्याचप्रमाणे देशातील छोट्या उद्योजकांची संपत्ती वाढवणाऱ्या योजनादेखील आहेत. अन्न प्रक्रियेपासून फायबर ऑप्टिक्सपर्यंत, रस्त्यांपासून नौवहनापर्यंत, तरुणांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत, ग्रामीण भारतापासून आयुषमान भारतपर्यंत, डिजिटल इंडियापासून स्टार्ट अप इंडियापर्यंत, हा अर्थसंकल्प देशातील सव्वाशे कोटी जनतेच्या इच्छा-अपेक्षा मजबूत करणारा अर्थसंकल्प आहे. देशाच्या विकासाला गती देणारा हा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प शेतकरी-स्नेही, सामान्य माणूस-स्नेही, व्यापार पर्यावरण-स्नेही आणि त्याचबरोबर विकास-स्नेही देखील आहे. यामध्ये व्यापार सुलभतेबरोबरच जीवन सुलभतेवर भर देण्यात आला आहे. मध्यम वर्गासाठी अधिक बचत, 21व्या शतकातील भारतासाठी नवीन पिढीच्या पायाभूत सुविधा आणि उत्तम आरोग्याची हमी- ही सर्व जीवन सुलभतेच्या दिशेने ठोस पावले आहेत.

आपल्या देशातील शेतकऱ्यांनी अन्नधान्य आणि फळ-भाज्यांचे विक्रमी उत्पादन करुन देशाच्या विकासात ऐतिहासिक योगदान दिले आहे. शेतकऱ्यांची स्थिती अधिक मजबूत करण्याच्या आणि त्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या दिशेने या अर्थसंकल्पात अनेक उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. गाव आणि कृषी क्षेत्रामध्ये अंदाजे साडेचौदा लाख कोटी रुपयांची विक्रमी तरतूद करण्यात आली आहे. 51 लाख नवीन घरे, 3 लाख किलोमीटर पेक्षा अधिक रस्ते, सुमारे 2 कोटी शौचालये, पावणेदोन कोटी घरांमध्ये वीज जोडणी, याचा थेट लाभ दलित, पीडित, शोषित, वंचितांना मिळेल. अशी ही कामे आहेत, जी खासकरुन ग्रामीण क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधीही घेऊन येतील.
आपल्या देशात सहकारी संस्थांना प्राप्ती करात सूट आहे. मात्र शेतकरी उत्पादक संघटना एफपीओ जी त्यांच्याप्रमाणेच काम करते, त्यांना हे लाभ मिळत नाहीत. म्हणूनच शेतकऱ्यांच्या मदतीसाठी स्थापन या शेतकरी उत्पादक संघटनेला प्राप्तीकरात सहकारी समित्यांप्रमाणे सवलत देण्याचा निर्णय प्रशंसनीय आहे. महिला बचत गटांना या 'शेतकरी उत्पादक संघटने'च्या मदतीने सेंद्रिय, सुगंधित आणि वनौषधी शेतीबरोबर जोडण्याची योजना देखील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यात एक महत्वपूर्ण पाऊल ठरेल. याचप्रमाणे, गोबर-धन योजना, गाव स्वच्छ ठेवण्याबरोबरच शेतकरी आणि पशुपालन करणाऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यात मदत करेल. आपल्याकडे

शेतकरी शेतीबरोबरच त्याच्याशी संबंधित वेगवेगळे व्यवसाय करतात. कुणी मासेपालन, कुणी पशुपालन, कुणी कुक्कुटपालन, कुणी मधमाशीपालनाशी जोडलेला आहे. अशा अतिरिक्त कामांसाठी बँकांकडून कर्ज घेण्यात शेतकऱ्यांना अडचणी येतात. शेतकरी क्रेडिट कार्डद्वारे आता मासेपालन आणि पशुपालनासाठी देखील कर्जाची व्यवस्था करणे खूप प्रभावी निर्णय आहे. भारतातील 700 पेक्षा अधिक जिल्हयांमध्ये जवळपास 7 हजार ब्लॉक किंवा खंड आहेत. या ब्लॉक मध्ये सुमारे 22 हजार ग्रामीण व्यापार केंद्रांच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, नवनिर्मिती आणि गावांशी त्यांना जोडण्यावर भर देण्यात आला आहे. आगामी काळात, ही केंद्रे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, रोजगार आणि कृषी आधारित ग्रामीण आणि कृषी अर्थव्यवस्थेची नवीन ऊर्जा केंद्रे बनतील. प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेअंतर्गत आता गावांना ग्रामीण बाजार, उच्च शिक्षण केंद्रे आणि रुग्णालयांना जोडण्याचे काम देखील केले जाईल. यामुळे गावातील लोकांचे जगणे अधिक सुकर होईल.

उज्ज्वला योजना ही योजना देशातील गरीब महिलांना केवळ धुरापासून मुक्ती मिळवून देत नाही तर त्यांच्या सक्षक्तीकरणाचे देखील एक मुख्य माध्यम बनत आहे. या योजनेचा विस्तार करून याचे आधीचे 5 कोटी कुटुंबांचे लक्ष्य वृद्धींगत करून आता 8 कोटी कुटुंब करण्यात आले आहे. या योजनेचा सर्वाधिक लाभ देशातील दलित, आदिवासी आणि मागासलेल्या वर्गाला मिळत आहे. अनुसूचित जाती आणि जमातीच्या विकासासाठी या अर्थसंकल्पात अंदाजे एक लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

निम्न मध्यम वर्ग आणि गरिबांना नेहमी भेडसावणारी चिंता म्हणजे आजारावरील उपचार. या अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या आयुष्यमान भारत या नवीन योजनेमुळे सर्व वर्गातील लोकांची चिंता मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. देशातील अंदाजे 10 कोटी गरीब आणि निम्न मध्यम वर्गीय कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. म्हणजेच 45 ते 50 कोटी लोकांना याचा लाभ मिळेल. या कुटुंबांना निवडक रुग्णालयांमध्ये दरवर्षी 5 लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य सुविधांचा लाभ मिळणार आहे. पूर्णत: सरकारी खर्चाने सुरू करण्यात आलेली ही जगातील आतापर्यंतची सर्वात मोठी आरोग्य सुविधा योजना आहे. देशातील सर्व मोठ्या पंचायतींमध्ये अंदाजे दीड लाख आरोग्य सुविधा केंद्र स्थापन करण्याचे पाऊल प्रशंसनीय आहे. यामुळे गावातील नागरिकांना आरोग्य सुविधा मिळणे अधिक सुकर होईल. देशभरात 24 नवीन वैद्यकीय महाविद्यालयांच्या स्थापनेमुळे लोकांना उपचार सुविधा तर मिळतील याबरोबरच युवकांना वैद्यकीय शिक्षण घेणे सहज शक्य होईल.

या अर्थसंकल्पात ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या लक्षात घेत अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. प्रधानमंत्री व्यय वंदना योजनेअंतर्गत आता ज्येष्ठ नागरिकांना 15 लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कमीत कमी 8 टक्के व्याज मिळेल. बँक आणि टपाल खात्यामधील त्यांच्या जमा रकमेवरील 50 हजारापर्यंतचे व्याज करमुक्त असेल. आरोग्य विमाच्या 50 हजार रुपयांपर्यंतच्या


प्रिमियमवर आयकरात सूट मिळेल तसेच गंभीर स्वरुपाच्या आजारांच्या उपचारासाठी एक लाख रुपयांपर्यंतच्या खर्चावर आयकरात सूट देण्यात येईल.

अनेक वर्षांसाठी आपल्या देशात सूक्ष्म-लघु आणि मध्यम उद्योगांना मोठ्या मोठ्या उद्योगांच्या तुलनेत अधिक कर भरावा लागत होता. या अर्थसंकल्पात सरकारने एक साहसी पाऊल उचलत एमएसएमईच्या करात 5 टक्के सूट दिली आहे. आता या उद्योगांना 30 टक्क्यांऐवजी 25 टक्के कर भरावा लागेल. एमएसएमई उद्योगांना आवश्यक निधी मिळावा, आवश्यक भांडवल मिळावे यासाठी बँक आणि एनबीएफसीच्या माध्यमातून कर्ज प्रणाली अधिक सुलभ करण्यात आली आहे. यामुळे मेक इन इंडिया अभियानाला देखील बळकटी प्राप्त होईल. मोठ्या उद्योगांमधील एनपीएमुळे एमएसएमईवर तणावाचे वातावरण होते. दुसऱ्यांच्या गुन्ह्यांची शिक्षा छोट्या उद्योजकांना होऊ नये म्हणून सरकार लवकरच एमएसएमई क्षेत्रात एनपीए आणि स्ट्रेस अकाऊंटसारख्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी ठोस उपाययोजनांची घोषणा करणार आहे.

रोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या दिशेने सरकारने एक दूरगामी सकारात्मक निर्णय घेतला आहे. यामध्ये अनौपचारिककडून औपचारिकतेकडे जाण्याची संधी मिळेल आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. आता सरकार नवीन कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीत तीन वर्षापर्यंत 12 टक्के निधी देणार आहे. या व्यतिरिक्त महिलांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी मिळाव्या आणि त्यांच्या गृह उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी नवीन महिला कर्मचाऱ्यांचा तीन वर्षांसाठी ईपीएफमधील योगदान 12 टक्क्यावरुन 8 टक्के करण्यात आले आहे. या कालावधीत नियोक्ताचे योगदान 12 टक्केच असेल.

आधुनिक भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सामान्य नागरिकांचे जीवन सुलभीकरण वाढवण्यासाठी आणि विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी भारतात नवीन पिढीसाठीच्या पायाभूत सुविधा अत्यंत आवश्यक आहेत. रेल्वे-मेट्रो-आथवे-बंदर-विमानतळ, पॉवर ग्रीड, गॅस ग्रीड, सागरमाला, भारतमाला डिजिटल इंडियाशी निगडीत पायाभूत सुविधांच्या विकासावर अर्थसंकल्पात अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. यासाठी अंदाजे 6 लाख कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ही अंदाजे एक लाख कोटींहून अधिक आहे. या योजनेमुळे देशात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. अर्थसंकल्पात मांडलेल्या उपरोक्त विषयान्वये असंघटीत क्षेत्रातील कामगारांना हाताला काम मिळेल आणि रोजंदारी मिळाल्यामुळे त्यांचा कौटुंबिक, आर्थिक विकास होईल.

# अर्थसंकल्प २०१८ : ठळक तरतुदी



कर रचना

>> टॅक्स स्लॅबमध्ये यंदा कोणताही बदल नाही
>> ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य विम्यावर ५० हजारापर्यंतची करसवलत
>> २०१८-१९ आर्थिक वर्षात ३.३ टक्के वित्तीय तुटीचं लक्ष्य
>> कृषी उत्पादक कंपन्या पहिल्या पाच वर्षांसाठी 100 टक्के करमुक्त

गुंतवणूक

>> म्युच्युअल फंडातून मिळालेल्या उत्पन्नावर १० टक्के कर
>> क्रिप्टोकरन्सीसारख्या चलन व्यापारावर निर्बंध आणण्यासाठी सरकार प्रयत्नशील
>> ४ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांना स्टॅण्डर्ड डिडक्शनमुळे जवळपास २१०० रुपयांचा फायदा

लोकप्रतिनिधींचे मानधन

>> एप्रिल २०१८ पासून खासदारांचा पगार वाढणार
>> राष्ट्रपतींना ५ लाख, उपराष्ट्रपतींना ४ लाख आणि राज्यपालांना ३ लाख रुपये वेतन मिळणार

विमान सेवा
>> ५६ नवी विमानतळं जोडली जाणार
>> ९०० पेक्षा अधिक विमाने खरेदी करणार
>> विमानतळांची संख्या ५ टक्क्यांनी वाढवणार

रेल्वे
>> सर्व रेल्वे स्टेशन, गाडीत वाय- फाय आणि सीसीटीव्ही सुविधा
>> देशभरात ६०० रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण
>> प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासासाठी 'राष्ट्रीय रेल्वे संरक्षण कोष' योजना
>> रेल्वेच्या विकासासाठी १ लाख ४८ हजार कोटी

नोकरी

>> ५० लाख तरुणांना नोकरीसाठी प्रशिक्षण देणार
>> वर्षभरात ७० लाख नवीन नोकऱ्यांची निर्मिती करणार
>> नव्या कर्मचाऱ्यांच्या पीएफमध्ये सरकार १२ टक्के रक्कम देणार

व्यापार
>> मुद्रा योजनेंतर्गत ३ लाख कोटींचे कर्ज वितरित करण्याचं लक्ष्य
>> नोटाबंदीनंतर नुकसान भरून काढण्यासाठी लघुउद्योगांना ३७०० कोटी
>> टेक्ट्सटाईल उद्योगासाठी ७१४० कोटी

आरोग्य

>> दवाखान्यातील खर्च कमी करण्यासाठी 'हेल्थ प्रोटेक्शन स्कीम'
>> टीबी रोखण्यासाठी ६०० कोटी
>> १० कोटी कुटुंबासाठी दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य खर्च करणार
>> ३ लोकसभा मतदारसंघामागे एक सरकारी वैद्यकीय रुग्णालय उभारणार
>> देशभरात २४ नवी वैद्यकीय महाविद्यालयं उभारणार
>> आरोग्य सुविधांसाठी 'आयुषमान भारत' कार्यक्रम
>> आरोग्यासाठी १.५ लाख कोटीची तरतूद

पाणी

>> स्वच्छ पाणी योजनेसाठी २६०० कोटी रुपयांची तरतूद
>> अमृत योजनेअंतर्गत ५०० शहरांना शुद्ध पिण्याचं पाणी पुरवणार
>> नमामी गंगे प्रकल्पाअंतर्गत १८७ योजनांना मंजुरी

घरे

>> ग्रामीण भागात घरे आणि पायाभूत सुविधांसाठी १४.३४ लाख कोटी
>> वर्षभरात ५१ लाख घरे बांधणार
>> २०२२ पर्यंत प्रत्येकाला घर देण्याचा प्रयत्न

शिक्षण

>> डिजिटल शिक्षणावर भर; १३ लाख शिक्षकांना प्रशिक्षण देणार
>> अनुसुचित जातींच्या विकासासाठी ५६ हजार कोटी
>> आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी एकलव्य शाळा उभारणार
>> विद्यार्थ्यांसाठी 'पंतप्रधान रिसर्च फेलो स्कीम'
>> बडोद्यात रेल्वे विद्यापीठ उभारणार
>> देशातील शिक्षणासाठी १ लाख कोटी
>> दर्जा सुधारण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत

महिला

>> देशातील ८ कोटी महिलांना उज्ज्वला योजनेअंतर्गत गॅस कनेक्शन

>> सौभाग्य योजनेतून ४ कोटी गरीब घरांना वीज कनेक्शन

>> स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून ६ कोटी शौचालयांची निर्मिती

>> शौचालय बांधण्यासाठी सरकारकडून कुटुंबाना ठराविक निधी उपलब्ध करुन दिला जाणार

# २०१७-१८ च्या केंद्रीय अर्थ संकल्पातील घोषणा

शेती

>> शेतीच्या कर्जासाठी ११ लाख कोटींचा निधी राखीव
>> शेतीतील पायाभूत सुविधा, पशुपालन, मत्स्यपालनासाठी १० हजार कोटी
>> अन्न प्रक्रिया उद्योगासाठी १४०० कोटी
>> पशूपालन करणाऱ्यांनाही मिळणार किसान क्रेडिट कार्ड
>> खरीप हंगामापासून हमीभावात दीडपट वाढ
>> २०२२ मध्ये शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचं लक्ष्य
>>टीव्ही, मोबाइल महागणार
>> ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य विम्यावर ५० हजारापर्यंतची करसवलत
>> टॅक्स स्लॅबमध्ये यंदा कोणताही बदल नाही
>> २०१८-१९ आर्थिक वर्षात ३.३ टक्के वित्तीय तुटीचं लक्ष्य
>> एप्रिल २०१८ पासून खासदारांचा पगार वाढणार
>> राष्ट्रपतींना ५ लाख, उपराष्ट्रपतींना ४ लाख आणि राज्यपालांना ३ लाख रुपये वेतन मिळणार
>> दोन सरकारी विमा कंपन्या शेअर बाजारात येणार
>> विमानतळांची संख्या ५ टक्क्यांनी वाढवणार
>> सर्व रेल्वे स्टेशन, गाडीत वाय- फाय आणि सीसीटीव्ही सुविधा
>> देशभरात ६०० रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण
>> प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासासाठी 'राष्ट्रीय रेल्वे संरक्षण कोष' योजना
>> रेल्वेच्या विकासासाठी १ लाख ४८ हजार कोटी
>> कर्मचाऱ्यांच्या पीएफमध्ये सरकार १२ टक्के रक्कम देणार
>> वर्षभरात ७० लाख नवीन नोकऱ्यांची निर्मिती करणार
>> स्वच्छ पाणी योजनेसाठी २६०० कोटी
>> मुद्रा योजनेअंतर्गत ३ लाख कोटी रुपये कर्ज
>> गंगा स्वच्छतेसाठी १८७ योजनांना मंजुरी
>> १० कोटी कुटुंबासाठी दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य खर्च करणार
>> आरोग्य सुविधांसाठी 'आयुषमान भारत' कार्यक्रम
>> आरोग्यासाठी १.५ लाख कोटीची तरतूद
>> बडोद्यात रेल्वे विद्यापीठ उभारणार

>> आरोग्य सुधारणा केंद्र उभारण्यासाठी १२०० कोटी
>> देशातील शिक्षणासाठी १ लाख कोटी
>> आदिवासी मुलांसाठी एकलव्य स्कूल उभारणार
>> १३ लाख शिक्षकांना प्रशिक्षण देणार
>> 'ऑपरेशन फ्लड' प्रमाणेच 'ऑपरेशन ग्रीन' लाँच करणार
>> ८ कोटी महिलांना उज्ज्वला गॅस कनेक्शन देणार
>> ४ कोटी घरांना मोफत वीजजोडणी देणार
>> स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत ६ कोटी शौचालय बांधणार
>> शेतीच्या कर्जासाठी ११ लाख कोटींचा निधी राखीव
>> ऑपरेशन ग्रीनसाठी ५०० कोटींची तरतूद
>> पशूधन विकास आणि मत्स्योद्योगांसाठी १० हजार कोटी
>> राष्ट्रीय बांबू मिशनसाठी २९० कोटी

लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती!

# अर्थसंकल्पातून मला काय?

## उज्ज्वला योजनेतून मोफत एलपीजी जोडणीमध्ये ८ कोटींपर्यंत विस्तार



## महिला

- उज्ज्वला योजनेतून मोफत एलपीजी जोडणीमध्ये ८ कोटींपर्यंत विस्तार
- नोकरदार महिलांना पहिल्या तीन वर्षांसाठी कर्मचारी भविष्य निधीतील स्व-योगदानात १२ टक्क्यांवरून ८ टक्क्यांपर्यंत घट
- महिला बचतगटांना कर्जपुरवठ्यात ३७ टक्क्यांपर्यंत वाढीचे लक्ष्य
- मुद्रा योजनेत ७६ टक्क्यांहून अधिक खाती महिलांची असून, योजनेसाठी कर्जपुरवठ्याचे लक्ष्य वाढून ३ लाख कोटींवर

## पगारदार

- उत्पन्नातून ४०,००० रुपयांच्या प्रमाणित वजावटीला पुन्हा सुरुवात
- प्राप्तिकराच्या रचनेत कोणत्याही सुधारणा नसल्याने करवाढ नाही, पण दिलासाही नाही
- एकूण करांवर ४ टक्के शैक्षणिक + आरोग्य उपकराची (अतिरिक्त १ टक्का) मात्रा
- केवळ 'ईज ऑफ लिव्हिंग' म्हणजे भविष्यात चांगल्या जीवनमानाच्या स्वप्नाचे कोरडे आश्वासन

## ज्येष्ठ नागरिक

- बँका-पोस्टातील ठेवींवरील करमुक्त व्याज उत्पन्नाची मर्यादा सध्याच्या वार्षिक १० हजारांवरून ५० हजारांवर
- वैद्यकीय खर्च, मेडिक्लेम हप्त्यासाठी खर्चातून करवजावटीची मर्यादा सध्याच्या ३० हजारांवरून ५० हजारांवर
- वार्षिक ८ टक्के निश्चित व्याज लाभ देणाऱ्या पंतप्रधान वय वंदना योजनेत कमाल गुंतवणुकीची मर्यादा सध्याच्या ७.५ लाखांवरून १५ लाखांवर
- पेन्शनधारकांसाठी ४०,००० रुपयांच्या प्रमाणित वजावटीचा पुन्हा प्राप्तिकरात समावेश करण्यात आला आहे.

## लघुउद्योजक/कारागीर

- सवलतीच्या २५ टक्के कंपनी कराच्या पात्रतेसाठी वार्षिक उलाढालीच्या मर्यादेचा ५० कोटींवरून २५० कोटी रुपयांपर्यंत विस्तार
- सवलतीत कर्जपुरवठ्यासाठी ३,७९४ कोटी रुपयांची तरतूद
- कर्ज थकीताच्या समस्येवर प्रभावी तोडग्यासाठी उपाययोजना लवकरच

शेतकरी

- खरिपाच्या पिकासाठी उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव प्रस्तावित
- देशभरात २२,००० ग्रामीण कृषी बाजारपेठातून थेट पणन सुविधा; २००० कोटींची तरतूद
- बाजारापर्यंत वाहतूक सुलभतेकरिता सडक सुधारणांवर भर
- प्रत्येकी १००० हेक्टरची समूह शेती विकासाची (क्लस्टर्स) केंद्रांची योजना
- बटाटा, टोमॅटो, कांदे अशा नाशिवंत जिनसांच्या भावातील चढ-उतारांच्या समस्येवर 'ऑपरेशन ग्रीन'मधून ५०० कोटींची तरतूद

# २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील असंघटीत क्षेत्रातील विकासाची भूमिका

## १. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार

आज शेतमालाचे मार्केटिंग करण्याची गरज असून यासाठी कृषी आणि वाणिज्य मंत्रालय संयुक्तपणे प्रयत्न करतील. तसेच शेतकऱ्यांना उत्पादन मुल्याच्या दीडपट हमीभाव देण्यात येईल. २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार, असे २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात जेटली यांनी स्पष्ट केले.

## २. नॅशनल बांबू मिशन

उज्ज्वला योजने अंतर्गत ८ कोटी महिलांना मोफत गॅस दिला जाणार आहे. सुगंधी वनस्पती उत्पादनाला विशेष प्रोत्साहन देणार येणार आहे. नॅशनल बांबू मिशनसाठी १२९० कोटी रूपयांची तरतूद करुण्यात आली

## ३. मस्त्य आणि पशू पालनासाठी आर्थिक तरतूद

नाबार्डच्या माध्यमातून सुक्ष्म सिंचनावर भर असेल. त्यात वाढ करण्याचा निर्णय आहे. निर्यात वाढविण्यासाठी खास योजना आखण्यात येणार आहेत. मस्त्य पालन आणि पशू पालनासाठी १० हजार कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेय. तर ४२ मेगा फूड पार्क उभारले जाणार आहेत. नाशवंत पदार्थांच्या अन्न प्रक्रियेसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अन्न प्रक्रिया उद्योगाला दुप्पट तरतूद करण्यात आलेय. सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देणार असल्याचे २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात स्पष्ट करण्यात आले आहे.

## ४. बाजार समित्या इंटरनेटने जोडल्या

शेतमाल आणि त्यांचं मार्केटींग करण्याची गरज, शेतीचा विकास 'क्लस्टर' करण्याची गरज आहे. महिल बचत गटातून नैसर्गिक शेती आणि त्यांच्या उत्पादनांचं मार्केटींग करण्यात येणार आहे. तर कृषी बाजार उभारण्यासाठी २००० कोटींची तरतूद करण्यात आलेय. ४७० कृषी उत्पन्न बाजार समित्या इंटरनेटने जोडण्यात आल्या. उरलेल्या बाजार समितीत काम सुरु आहे. तसेच आयात निर्यातीसाठी वेगळी यंत्रणा उभारणार असल्याचे २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात सांगितले आहे.

## ५. जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना

देशात इंग्लडच्या धर्तीवर मोठी आरोग्य सेवा योजना सुरु करण्यात येणार आहे. जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना सुरू करणार, असल्याचे जेटली यांनी अर्थसंकल्प सादर करताना सांगितले. तसेच आर्थिक दुर्बलांसाठी सर्वात मोठी आरोग्य विमा योजना सुरु करण्यात येणार आहे. १० कोटी कुटुंबासाठी राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजना असणार आहे. त्याचवेळी ४० टक्के लोकसंख्येला असणाऱ्या गावाला आरोग्य विमा योजनेचे कवच मिळणार आहे. तसेच ५० कोटी लोकांना आरोग्य सेवा योजनेअंतर्गत ५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेय.

### २४ नवीन वैद्यकीय महाविद्यालये

राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना १२०० कोटी खर्च करून देशात राबविण्यात येणार आहे. तर ५.२२ कोटी कुटुंबांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचा लाभ घेतला येणार आहे. एका लोकसभा मतदार संघामागे एक मोठे रुग्णालय बांधणार येणार आहे. तसेच २४ नवीन वैद्यकीय महाविद्यालये उभारण्यात येणार असल्याची माहिती अरुण जेटली यांनी दिली.

### ग्रामीण आरोग्य सेवेला प्राधान्य

ग्रामीण भागातील आरोग्य सेवेला प्राधान्य देण्यात येणार आहे. ग्रामीण लोकांना चांगली आरोग्य सेवा मिळावी म्हणून आर्थिक दुर्बलांसाठी सर्वात मोठी आरोग्य विमा योजना राबविण्यात येणार आहे. तसेच दीड लाख नवीन आरोग्य केंद्र सुरू करण्यात येणार आहेत.

### ठळक बाबी :

- आर्थिक दुर्बलांसाठी सर्वात मोठी आरोग्य विमा योजना
- एका लोकसभा मतदार संघामागे एक मोठे रुग्णालय बांधणार
- २४ नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू करणार

- टीबी रोखण्यासाठी नव्याने ६०० कोटी रूपयांची तरतूद

- ४० टक्के लोकसंख्येला मिळणार आरोग्य विमा योजनेचे कवच

- जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना सुरू करणार

- देशातील शिक्षणावर एक लाख कोटी खर्च करणार

- इंग्लडच्या धर्तीवर मोठी आरोग्य सेवा योजना सुरू करणार

- १० कोटी कुटुंबासाठी राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजना सुरू करणार

- दीड लाख नवीन आरोग्य केंद्र सुरू करणार

- ५० कोटी लोकांना आरोग्य सेवा योजनेअंतर्गत ५ लाख रुपयांची तरतूद

- राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना १२०० कोटी खर्च करून देशात राबवणार

- ५.२२ कोटी कुटुंबांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचा लाभ घेतला

- आरोग्य सुविधांसाठी 'आयुष्यमान भारत' कार्यक्रम, ५० कोटी नागरिकांना लाभ होणार

# ६. मुंबई रेल्वेचा विस्तार

## रेल्वे सुरक्षेला प्राधान्य

रेल्वेसाठी १ लाख ४८ हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याची घोषणा अर्थमंत्री अरुण जेटली यांनी केली. संपूर्ण रेल्वे ब्रॉडगेज करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. रेल्वे सुरक्षेला सरकारचे प्रथम प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मुंबई बुलेट ट्रेन काम सुरु

मुंबई रेल्वेचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे. ९० किलोमीटरपर्यंत मार्ग वाढवण्यात येणार आहे. तसेच ४० हजार कोटी रुपये एलिव्हेटेड कॉरिडोरच्या उभारणीसाठी खर्च केले जाणार आहेत. मोदींच्या महत्त्वाकांक्षी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठीच्या मार्गाचे काम सुरू करण्यासाठी ज्या आवश्यक बाबी आहेत, त्या पूर्ण करण्यात येतील. बडोदा येथे कर्मचारी प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे, अशी माहिती जेटली यांनी दिली.

## ७०० नवीन इंजिने आणि ५१६० नवीन डबे

यावर्षी रेल्वेची ७०० नवीन इंजिने आणि ५१६० नवीन डबे तयार करण्यात येणार आहेत. सर्व रेल्वे स्थानकांवर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. यावर्षी ६०० रेल्वे स्थानके अत्याधुनिक करण्यात येणार असून, स्थानके अद्ययावत आणि सरकते जिने बसवण्यात येणार आहेत. तसेच वाय-फाय सुविधाही देण्यात येणार आहे. रेल्वे रुळ देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांवरही विशेष लक्ष दिले जाईल. ३६०० किलोमीटर रुळांचं नुतनीकरण करण्यात येणार आहे, असे जेटली यांनी स्पष्ट केले.

## १८००० किमी रेल्वे मार्गांचे दुहेरीकरण

३ हजार ६०० किमीचे नवीन मार्ग असून पुढील दोन वर्षांत ४२६७ मानवरहित रेल्वे क्रॉसिंग बंद केली जातील. १८००० किमी रेल्वे मार्गांचे दुहेरीकरण करण्यात येणार आहे. तसेच बंगळुरमधील उप-नगरीय रेल्वे विकासासाठी १७,००० कोटींची तरतूद करण्यात आलेय.

# प्रकल्पाचे मूल्यमापन

दैनिक

लोकसत्ता

मधून

लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती!

# सर्व घटकांना सामावून घेणारा अर्थसंकल्प



( संग्रहीत प्रतिकात्मक छायाचित्र )

अर्थमंत्री अरुण जेटली यांनी अर्थसंकल्प मांडताना ग्रामीण भाग, शेतकरी, मध्यमवर्गीय, ज्येष्ठ नागरिक अशा सगळ्या स्तरांतील घटकांचा विचार केला आहे, ही या अर्थसंकल्पातील सर्वात सकारात्मक गोष्ट आहे. अपेक्षेप्रमाणे हा अर्थसंकल्प सामान्य जनतेसाठी मांडलेला अर्थसंकल्प आहे; त्यापेक्षा जास्त काही यातून हाती लागले आहे असे मला तरी वाटत नाही.

शेतकरी आणि ग्रामीण भागावरचा फोकस हा जाणवण्याएवढा मोठा आहे. आरोग्य सुविधा, विमा कवच, स्वयंपाकाचा गॅस पुरविणे ह्या गोष्टींचा विचार अग्रक्रमाने करण्यात आलेला दिसून येत आहे, ज्याचे स्वागत करायला हवे. ग्रामीण भागातील राहणीमान सुधारणे हाही एक महत्त्वाचा उद्देश यंदाच्या अर्थसंकल्पात दिसून आला. माझ्या दृष्टीने हीसुद्धा एक अत्यंत स्वागतार्ह गोष्ट आहे. ग्रामीण भागातल्या पायाभूत सुविधांसाठी सुमारे १४.३४ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही महत्त्वाची आणि भरीव तरतूद आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच शेतीतील उत्पन्न आणि उत्पन्नावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना साहाय्य करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आल्याचे दिसून येत आहे. शेतीच्या क्षेत्रात 'क्लस्टर बेस अ‍ॅप्रोच' ठेवून सुधारणा करणे हेदेखील एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. एकूणच शेतीला चांगले दिवस आणणे हा सध्या अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे, या अर्थसंकल्पातून हा उद्देश सफल व्हावा ही अपेक्षा आहे.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चरच्या दृष्टिकोनातून विचार केला तरी हा अर्थसंकल्प महत्त्वाचा आहे असे मला वाटते. अर्थमंत्र्यांनी कृषीला दिलेल्या प्राधान्याचे मराठा चेंबरतर्फे मी स्वागत करतो. राष्ट्रीय बांबू मिशनसाठी २९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बांबूचा गवत विभागात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे त्याचे पीक घेण्याला प्रोत्साहन दिले जाणार आहे. तसेच त्याच्या तोडणीसाठीचे निंबधही उठवण्यात येणार आहेत. त्यामुळे जैव इंधनापासून हस्तकलेच्या वस्तूंपर्यंत बांबूला मोठी बाजारपेठ मिळणार आहे. बांबूपासून जैव इंधन तयार करण्यावर सध्या 'प्राज इंडस्ट्री'तर्फे संशोधन सुरू आहे. त्यामुळे बांबूसाठी करण्यात आलेल्या या तरतुदीचे स्वागत करतो. सिंचनासाठी करण्यात आलेली तरतूद आणि कृषी क्षेत्रातील टाकाऊ घटकांसाठी करण्यात आलेली तरतूदही महत्त्वाची वाटते. पंजाब, हरयाणा, उत्तर प्रदेशसारख्या राज्यांमध्ये शेतीतील टाकाऊ घटक जाळले जातात, त्यातून प्रदूषण आणि पर्यावरणाची हानी या दोन

त्रासदायक गोष्टी होतात. सध्याच्या तरतुदीमुळे या टाकाऊ घटकांपासून जैव इंधन तयार करणे शक्य होणार आहे.

ग्रामीण भागातील सर्वांसाठी परवडणाऱ्या किमतीत घरे ही यंदाच्या अर्थसंकल्पातली आणखी एक महत्त्वाची तरतूद आहे. बचत गटांसारख्या स्व-मदत गटांना कर्ज उपलब्ध करून देण्याची तरतूद या अर्थसंकल्पात आहे. थोडक्यात, ग्रामीण भागाचा विकास करणे आणि ग्रामीण भागाला मुख्य प्रवाहात आणणे यंदाच्या अर्थसंकल्पाच्या अजेंड्यावर असल्याचेच या तरतुदीतून आपल्या लक्षात येईल. शिक्षण हा घटक यंदा अर्थसंकल्पाच्या अग्रक्रमावर आहे. अंगणवाडी, प्राथमिक शाळा ते कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण आणि उच्चशिक्षण यांचाही पुरेसा विचार करण्यात आला आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये शाळा सोडून देणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या हे सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील मुख्य आव्हान आहे. 'इनोव्हेशन्स'ला वाव देण्यासाठी १००० हुशार मुलांसाठी खास शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे.

१० कोटी कुटुंबांना वर्षाला पाच लाख रुपयांपर्यंतचे विमा कवच सरकारकडून जाहीर करण्यात आले आहे. नॅशनल हेल्थ स्किमच्या जवळ जाण्याकडे हा प्रवास आहे, असे म्हणायला हरकत नाही. गंगा स्वच्छता, कॉर्पोरेट कर ३० टक्क्यांवरून २५ टक्के करण्याचा निर्णय असे महत्त्वाचे निर्णयही या अर्थसंकल्पात घेण्यात आले आहेत, ज्यामुळे कंपन्यांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

– प्रमोद चौधरी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक प्राज इंडस्ट्रिज

लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती!

# लघुउद्योगांना प्रोत्साहनातून विकास, रोजगारनिर्मितीची पायाभरणी

मागील काही वर्षांप्रमाणे अर्थसंकल्पातून यंदाही पायाभूत सोयीसुविधांच्या विकासावर सरकारचा भर दिसून येतो. जे निव्वळ अपरिहार्य आणि अत्यावश्यकच आहे. वाहिन्यांवरील चर्चेत शेअर बाजारातील व्यवहार दीर्घ मुदतीच्या भांडवली लाभ कराच्या कक्षेत आणणे अथवा वित्तीय तुटीच्या मर्यादेचे पालन सरकारला न करता येण्याबाबत विश्लेषक नाके मुरडत असले, तरी अर्थसंकल्पातून नेमका खर्चाचा विनियोग कसा आणि कुठे करावा, या निकषाने मापन करायचे झाल्यास प्राप्त परिस्थितीत चोख वृद्धिपूरक दिशानिर्देशासाठी यंदाच्या अर्थसंकल्पाला सर्वच्या सर्व गुण दिले गेले पाहिजेत.

सर्वसामान्य माणूस मग तो शहरातील अल्प-मध्यम वेतन मिळविणारा पगारदार असो, छोटा-मोठा व्यावसायिक असो अथवा बडा उद्योजक अथवा ग्रामीण शेतकरी, कारागीर, मजूर, महिला, विद्यार्थी असोत, या सर्वांच्या झोळीत अर्थसंकल्पाने भरभरून दिले आहे. 'इज ऑफ डुइंग बिझनेस' बरोबरीने, सर्वसामान्य जनतेच्या 'इज ऑफ लिव्हिंग'ची आस अर्थसंकल्पाने ध्यानात घ्यावी, हे खास कौतुकास्पदच।

पायाभूत विकासासाठी यंदा ऐतिहासिक उच्चांकी तरतूद अर्थसंकल्पात आहे. कोणतीही नवी योजना प्रत्यक्षात जाहीर केली गेली नसली तरी पूर्वनिर्धारित योजनांनुसार रस्ते, रेल्वे, विमानतळ, बंदरे, रेल्वे वगैरे सुविधांच्या विकासावर सरकारचा अग्रक्रम कायम असल्याचे यातून दिसून येते.

अर्थसंकल्पाचे सर्वात लक्षणीय वैशिष्टय़ म्हणजे, रोखे बाजारातून कंपन्यांची किमान एक चर्तुथांश भांडवली गरज पूर्ण केली जाईल, अशी यंत्रणा बाजार नियामक 'सेबी'ने तयार करावी असे अर्थमंत्र्यांनी सूचित केले आहे. म्हणजे कंपन्यांना तीन-चतुर्थांश वित्त पुरवठा बँकांकडून तर उर्वरित रोखे बाजार (बाँड मार्केट) करेल. पेन्शन फंड, विमा कंपन्यांनाही आता 'ए' पतधारणा असलेल्या रोख्यांमध्ये गुंतवणुकीला मुभा असेल, असे अर्थमंत्र्यांनी सांगितले. आजवर त्यांना केवळ 'डबल ए' म्हणजे अधिक उच्च पतधारणा असलेले रोखेच गुंतवणुकीसाठी केवळ खुले होते. देशासाठी उत्पादक विकासात वापरता येईल यासाठी दीर्घ मुदतीचे भांडवल निर्माण करण्यात रोखे बाजाराची महत्त्वाची भूमिका आहे.


रोजगारात वाढीचे आणखी एक पाऊल म्हणजे, सूक्ष्म, लघू आणि मध्यम (एमएसएमई) उद्योगांसाठी अर्थसंकल्पात केल्या गेलेल्या आवश्यक आणि मोठय़ा तरतुदी होय. सुलभ वित्तपुरवठा, त्यांच्या कर्जथकिताच्या समस्येचे समाधान या एमएसएमई उद्योगांच्या गरजा अर्थसंकल्पातून पहिल्यांदाच ध्यानात घेतल्या गेल्या आहेत. बँकांकडून ही कर्जे विनाविलंब आणि ऑनलाइन मंजूर केली जातील अशी प्रभावी व्यवस्थाही सुचविली गेली आहे. व्यावसायिकांना भरलेले जीएसटी परतावे हे जीएसटीएन संकेतस्थळावरून पडताळून आणि बडय़ा उद्योगांप्रमाणे 'बिग डेटा'चा वापर करून बँका आणि वित्तसंस्थांना ही कर्जमंजुरी करता येणे शक्य असल्याचेही अर्थमंत्र्यांनी सुचविले. कल्पनातीत ठरेल अशी ही उपाययोजना असून तिचे चांगले दूरगामी परिणामी दिसून येतील.

अर्थउभारीला पूरक भांडवली खर्चात वाढीसाठी सरकारची कटिबद्धता स्पष्ट दिसून येते. मात्र खासगी गुंतवणुकीचे घोडे अडले असल्याचे टुमणे सारखे सुरू आहे. मात्र पायाभूत प्रकल्पांच्या विकासातून म्हणजे सीमेंट, पोलाद, वाहतुकीची साधने आणि अन्य भांडवली वस्तूंना मागणी वाढणार आणि अर्थातच या जिनसांच्या उत्पादकांना मागणीला अनुसरून गुंतवणूक वाढविणे क्रमप्राप्त ठरणार, हे अर्थगणित समजून घ्यायला हवे. आगामी वर्ष हे दमदार आर्थिक वृद्धीचे असेल आणि खासगी उद्योगांना या प्रवासाचे लाभार्थी होण्यासाठी भांडवली गुंतवणुकीचे पाऊल अटळपणे टाकावेच लागणार.

– राजेश मोकाशी, व्यवस्थापकीय संचालक, केअर रेटिंग्ज

लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती!

# आरोग्य, शिक्षण, कृषीला दिलेले प्राधान्य योग्यच



केंद्र सरकारने आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आश्वासन दिले होते की, सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट केले जाईल. पण, वस्तुस्थिती अशी आहे की, गेल्या चार वर्षांत शेती उत्पन्न स्थिरच राहिलेले आहे. कृषी उत्पादनही जेमतेम दोन टक्क्यांनीच वाढले. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपटीने वाढवायचे असेल तर त्यांचे उत्पन्न दरवर्षी १२ ते १४ टक्क्यांनी वाढले पाहिजे. त्यानुसार केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी हमीभावासंदर्भात महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चापेक्षा ५० टक्के अधिक हमीभाव दिला जाईल. म्हणजे शेतीमालाला हमीभाव १५० टक्के असेल. मात्र, प्रत्यक्ष अर्थसंकल्पीय दस्तऐवज बघितले तर त्यामध्ये ग्रामीण व शेतीवरील एकूण आर्थिक तरतुदीत सहा टक्के वाढ झाल्याचे दिसते. एकूण अर्थसंकल्पही १०टक्क्यांनी वाढला. नोटबंदी तसेच, वस्तू व सेवा करांमुळे उद्योग अधिकृत होण्याचे वाढलेले प्रमाण यामुळे करदात्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली. अप्रत्यक्ष आणि प्रत्यक्ष करसंकलनातही वाढ झाली. प्राप्तिकर संकलनात २० टक्क्यांनी वाढल्याचे दिसते.

अर्थसंकल्पातील दुसरी मोठी बाब म्हणजे, आरोग्य विमा. देशातील १० कोटी कुटुंबांना म्हणजे ५० कोटी भारतीयांना पाच लाखांचा विमा मिळणार आहे. याचा अर्थ असा की, आरोग्य सुरक्षा आणि शिक्षण या दोन घटकांवर अर्थमंत्र्यांनी अधिक भर दिलेला आहे. त्यातून विकसित मनुष्यबळ (ह्युमन कॅपिटल) निर्माण होईल. भारताची सकारात्मक बाब म्हणजे तरुण लोकसंख्या. पण या तरुणांना योग्य प्रशिक्षण दिले नाही तर त्यांच्यात कौशल्य निर्माण होणार नाही. तसे झाले नाही तर त्यांचा पूर्ण क्षमतेने त्यांचा वापर करता येणार नाही. आरोग्य, शिक्षण, कृषी ही तिन्ही क्षेत्रे राज्यांच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे संबंधित योजनांची अंमलबजावणी राज्यांना करावी लागणार आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील दोन महत्त्वाची आव्हाने आपल्यासमोर आहेत. एक, कच्च्या तेलाच्या किमती वाढत आहेत. गेल्या सहा महिन्यांत तेलाच्या किमतीत ६० टक्के वाढ झाली. त्याचा परिणाम सरकारी तूट, इंधनावरील अनुदान, चलनवाढ यावर होणार आहे. दोन, अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेने अर्थात फेडरल रिझर्व्हने आता व्याजदर वाढवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे भारतात थेट गुंतवणुकीद्वारे येणारा निधी कमी होऊ शकतो. त्याचा परिणाम देशातील गुंतवणुकीवर, रोखे बाजारावर, विनिमय दरावर होऊ शकेल. अशा परिस्थितीत आपल्या अर्थव्यवस्थेला कसे सावरायचे आणि विकासदराला पुन्हा कशी गती द्यायची ही आव्हाने केंद्रीय अर्थमंत्र्यांसमोर आहेत.

या अर्थसंकल्पामध्ये पाच बाबींना प्राधान्य दिले गेले. रोजगारनिर्मिती वाढवणे, कृषी क्षेत्राचा विकास, खासगी गुंतवणुकीला पुन्हा चालना देणे, निर्यात वाढवणे. जगाची अर्थव्यवस्था आता सुधारू लागली आहे. त्यातुलनेत भारताच्या निर्यातीला गती मिळालेली नाही. निर्यातीचा उद्योग क्षेत्राशी घनिष्ठ संबंध असतो. पाचवा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बँकिंग क्षेत्रातील थकीत कर्जासारखे प्रश्न सोडवणे. या प्रश्नभूमीवर ही पाच आव्हाने केंद्र सरकारने योग्य रीतीने हाताळावीत, अशी लोकांची अपेक्षा होती.

अर्थसंकल्पात मध्यमवर्गासाठी फारशी सवलत मिळालेली नाही. प्राप्तिकर दरात बदल झालेला नाही. प्रमाणित वजावटीत वाढ झाली असली तरी त्याचा नक्त परिणाम दोन टक्के इतकाच असेल. दीर्घकालीन भांडवली नफ्यावर आता कर लागणार आहे. गेल्या वर्षी पावणेचार लाख कोटींचा नफा मिळवला गेला, तो पूर्णपणे करमुक्त होता. गेली वीस वर्षे म्हणजे १९९७ पासून दीर्घकालीन भांडवली नफा करमुक्त आहे. त्यावर कर लावणे गरजेचे होते. हा कर प्रत्यक्ष आहे. वस्तू व सेवा कर हा अप्रत्यक्ष कर आहे. हा कर गरिबांसाठी अन्याय्य असतो. त्यात वाढ होण्यापेक्षा प्रत्यक्ष कर वाढणे योग्य असते. त्यामुळे दीर्घकालीन भांडवली नफ्यावरील कर योग्यच म्हणावा लागेल.

–अजित रानडे, बिर्ला ग्रुपचे मुख्य अर्थसल्लागार

लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती!

# अर्थसंकल्प : शेतकऱ्यांना उभे करणारा की आडवे पाडणारा?



( संग्रहीत प्रतिकात्मक छायाचित्र )

अर्थमंत्री अरुण जेटली यांचा सादर केलेला अर्थसंकल्प गतवर्षीप्रमाणे यंदाही फसवा आणि गाजर दाखवणारा आहे. शेतकरी आणि ग्रामीण भागातील जनता मोठ्या अपेक्षेने केंद्रीय मंत्र्यांच्या बजेटकडे लक्ष देऊन होती. यावर्षीच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या गळ्याभोवतीचा फास बाजूला करून मदतीचा हात पुढे करतील ही अपेक्षा होती, मात्र ही अपेक्षा या अर्थसंकल्पाने फोल ठरवलेली आहे. तीन मूलभूत गोष्टींमधील किमान आधारभूत किंमत, कर्जमुक्त शेतकरी आणि कोरडवाहू क्षेत्रासाठी सिंचाई योजना यापैकी अघोषित खरीप पिकांच्या किमान आधारभूत किमतीत दीडपटीने वाढ करण्याचे आश्वासन दिले असले तरी शासकीय यंत्रणेने निर्धारित किमान आधारभूत किमतीत सगळा माल खरेदी करण्याची हमी आणि निधीचा अभाव याचा विचार अर्थमंत्र्यांनी केलेला दिसत नाही. कर्जमुक्तीच्या संदर्भात अर्थमंत्र्यांनी अतिशय सफाईने विषय टाळलेला दिसत आहे. यामुळे मिळणाऱ्या भांडवलाची तरतूद न झाल्यामुळे पुढील दोन्ही हंगाम शेतकऱ्यांच्या दृष्टीने अवघड जाणार आहे. हे निश्चित आहे. ८५ टक्के कोरडवाहू क्षेत्रासाठी मुख्य गरज पाणी साठवण्यासाठी आणि सूक्ष्म सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जर आपण एकूण क्षेत्राचा आणि शेतकऱ्यांचा विचार केला तर २६०० कोटी रुपयांची तरतूद अतिशय तोकडी आहे. तसेच धान्य साठवणुकीच्या अभावामुळे होणाऱ्या नुकसानीच्या चर्चा आपल्या प्रत्येक सभेत पंतप्रधान करतात, परंतु अर्थसंकल्पाने गोदाम उभारणी, शीतगृह, गोडाऊन, वेअर हाऊसेससाठी कोणतीही तरतूद केली नाही.

अर्थमंत्र्यांना बहुधा किमान आधारभूत किमतीच्या बाबतीत जास्तच आत्मविश्वास असल्याचे जाणवते. मोदी सरकारने सत्तेत येण्यापूर्वी दीडपट हमीभावाचे आश्वासन दिले होते. निवडून आल्यावर दीडपट हमीभाव देता येत नाही, असे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात याच सरकारने दिले होते. त्यामुळे त्याच वेळी त्यांचे दुटप्पी धोरण पुढे आले आहे. अर्थमंत्र्यांनी यंदा रब्बीचे हमीभाव उत्पादन खर्चापेक्षा दीडपट असल्याचा दावा केला, तो आकडेवारीने सर्व पिकांबाबत सिद्ध होणारा नाही. शिवाय, खरिपाच्या पिकांना हमीभाव दीडपट मिळेल, असे अर्थमंत्री म्हणतात पण साराच शेतमाल सरकार खरेदी करू शकत नाही, करत नाही हे वारंवार दिसलेले असताना, बाजारपेठेत कृषिमालाच्या दरामधील चढउतारासाठी हस्तक्षेप निधीची तरतूद करणे अत्यावश्यक होते. तसेही झालेले दिसत नाही. वास्तविक, हमीभाव आणि ते ठरविणारा कृषिमूल्य आयोग हे सरकारच्या हातचे बाहुले राहू नये, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. कृषिमूल्य आयोगाला स्वायत्तता देण्याचा

विचार हे सरकार करणार नाही, हेच स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे दीडपट हमीभावाचे गाजर ठरू नये ही अपेक्षा.

साखर, कापूस या प्रमुख उद्योगांच्या बाबतीत विशेष तरतूद केलेली नाही. सौर उर्जा खरेदी करण्याचे आश्वासन जरी दिले असले तरी पॅनेल उभे करण्यासाठी तरतूद नाही. त्यासाठी ग्रामीण भागातील लोकांची क्रयशक्ती नाही. खताच्या उत्पादनासाठी स्वयंपूर्ण केले जात असताना खत उत्पादनाच्या वाढीसाठी तरतूद नाही. ३४ हजार कोटी रुपयांचे अनुदान वाढलेल्या दराच्या तुलनेत किमान ७५ हजार कोटीची तरतूद करणे आवश्यक होते. कृषी प्रक्रिया उद्योगासाठी १४०० कोटी रुपयांची केलेली तरतूद जरी दुप्पटीने वाढवले असे म्हणणे असले तरी ४२ मेगा फूड पार्क आणि ग्रामीण भागातील कृषी प्रक्रिया उद्योग या तरतुदीतून कसे उभे राहतील, हा प्रश्नच आहे. एकदंरीत शेतकऱ्यांना उभे राहण्याची मदत करण्याऐवजी शेतकऱ्यांना आडवे पाडणारा हा अर्थसंकल्प दिसतो.

निवडणुकीसाठी सादर केलेला अर्थसंकल्प असून देशातील तरुणांची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन विशेष व्होट बँक आपल्या ताब्यात राहावी म्हणून मुद्रा योजनेंतर्गत तरतूद (तीन लाख कोटी रुपये) हे याचेच द्योतक आहे.

– राजू शेट्टी, खासदार, स्वाभिमानी, शेतकरी संघटना